# आदिवासींमध्ये स्त्री आरोग्याचा परंपरागत विचार व उपाययोजना आणि आधुनिक आरोग्य व्यवस्थेचा स्वीकार (गोंड जमातीच्या संदर्भात)

**वैशाली केशवराव हटवार**
संशोधन अधिछात्रा
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश (Abstract)**

भारतातील आदिवासी समुदायांमध्ये आरोग्य विषयक धारणा सांस्कृतिक परंपरेशी घट्ट जोडलेल्या आहेत. गोंड जमात ही लोकसंख्येने मोठी व सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध जमात असून स्त्री आरोग्याबाबत तिच्या पारंपारिक प्रथा, परंपरा, लोकोपचार अत्यंत विशिष्ट आहेत. गोंड जमातीत स्त्रियांचे आरोग्य,पारंपरिक ज्ञान, औषधी वनस्पती, देवदेवता, भूत प्रेत, उपचार, प्रसुती, प्रथा यावर आधारित आहे. आधुनिक आरोग्य सेवा यंत्रणा ग्रामीण व आदिवासी भागांपर्यंत पोहोचत असली तरी तिचा स्वीकार समान प्रमाणात होत नाही. मातृआरोग्य, प्रसुती काळजी, पौष्टिकता, मासिक पाळी, विशिष्ट लोकविश्वास, आणि उपाययोजना प्रचलित आहेत. उदा. शासकीय आरोग्य सेवा विस्तार, आशा व अंगणवाडी सेविका, आरोग्य मोहिमा, मातृ मृत्यू कमी करण्याचे कार्यक्रम, यामुळे आधुनिक आरोग्य सेवेच्या स्वीकार वाढत आहे. या संशोधनात गोंड महिलांच्या आरोग्यविषयक पारंपरिक धारणा, स्थानिक उपचार, आधुनिक आरोग्य व्यवस्थेप्रती असणारी उपलब्धता, विश्वास, अडथळे स्वीकाराचे नमुने यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

या संशोधनात गोंड जमातीत स्त्री आरोग्याशी संबंधित परंपरागत विचार व उपाययोजनांचा अभ्यास करण्यात आला असून त्यांच्या आधुनिक आरोग्य व्यवस्थेशी असलेले संबंध विशद करण्यात आलेले आहे. या अध्ययनात दोन्ही पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करून स्वीकार वाढवण्याची आवश्यक दिशा सुचवली आहे.

**बीजशब्द ( Keywords)**
गोंड जमात, स्त्री आरोग्य परंपरागत उपचार, लोकवैद्य मातृआरोग्य, आधुनिक सेवा, सामाजिक विश्वास, आरोग्याच्या स्वीकार.

**प्रस्तावना (Introduction)**

भारताच्या सांस्कृतिक विविधतेत आदिवासी समाजामध्ये गोंड जमातीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गोंड जमात आजही आपल्या कौटुंबिक मूल्यांची जोपासना करीत आहे. आदिवासी संस्कृती भारतीय सामाजिक संरचनेच्या एक अत्यंत महत्त्वाच्या घटक आहे. मध्य भारतात ही विस्तृतपणे आढळणारी गोंड जमात ही सांस्कृतिक परंपरा, विश्वास, लोकवैद्य आणि निसर्गनिष्ठ पद्धतीने साठी प्रसिद्ध आहे. या समाजातील स्त्री आरोग्य हे केवळ जैविक न राहता सांस्कृतिक अंगाने विश्लेषित केले जाते. तिचे सामाजिक व धार्मिक जीवन निसर्गाशी सुसंगत असून आरोग्य व रोग यांची संकल्पना अतिशय स्थानिक व दैवी आहे. स्त्री आरोग्य हे गोंड समाजात कौटुंबिक व सामाजिक संरचनेत महत्त्वाचे स्थान राखते. मात्र पारंपारिक आचार आणि आधुनिक आरोग्यसेवा यातील दृष्टिकोनातील फरक स्त्रियांच्या आरोग्य स्थितीवर विशेष परिणाम करीत असतात.

भारतात विविध धर्म, वंश संस्कृतीचे लोक राहतात. तसेच विविध भाषा आणि बोली बोलणारे लोक राहतात. त्यामुळे भारतीय समाजात विविधता आहे. आपल्या देशात सहा हजारांपेक्षा जास्त जाती आहेत. जातीप्रमाणेच विविध आदिवासी जमाती सुद्धा आहेत. देशातील जवळपास सर्वच राज्यात आदिवासी लोक राहतात. आदिवासी समाज म्हणजे ओळखले जाणारे आदिवासी जमातीचे जीवनमान आजच्या युगामध्ये जर पाण्यात आले तर अतिशय निम्न दर्जाचे असून अन्न, वस्त्र, निवारा ह्या अति आवश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता देखील त्यांच्याकडून होत नाही. भारतीय आणि पाश्चात्य संशोधकांच्या अध्ययनातून असे प्राप्त होते की, आदिवासी गोंड समाज इतर समाजापेक्षा वेगळा असून त्यांची सामाजिक वैशिष्ट्ये इतर समाजापेक्षा वेगळी आहेत. त्याचप्रमाणे त्यांची आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक पद्धती भिन्न आहे. अशा या भिन्न परिस्थिती असलेल्या गोंड समाजातील स्त्रियांचे जीवनमान सुद्धा इतर समाजातील स्त्रियांपेक्षा अगदी भिन्न आढळते. गोंड जमातीत स्त्रीला कुटुंब व समाजाच्या टिकावासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारी घटक मानले जाते. घरगुती कामे, शेती, जंगलावर आधारित उपजीविका, संतती संवर्धन आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन या सर्व बाबींमध्ये स्त्रीच्या सहभाग केंद्रस्थानी आहे. त्यामुळे स्त्री आरोग्य हा केवळ वैयक्तिक विषय नसून सामाजिक आरोग्याच्या मूलभूत आधार आहे.

आदिवासी समुदाय हा दुर्गम प्रदेशात राहत असल्यामुळे कित्येक दिवस आदिवासी समुदायाला शुद्ध, स्वच्छ,पाणी मिळत नाही. तसेच आरोग्याच्या सुविधांची देखील वानवा आढळून येते. त्याचबरोबर सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था बहुतांश आदिवासी क्षेत्रात आढळून येत नाही. वैद्यकीय सोयी, सुविधा मिळाव्यात यासाठी

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

पुरेशा प्रमाणात दळणवळणाची सुविधाही नसते. यामुळे गोंड आदिवासी समुदायांना विविध स्वरूपाच्या आजारांशी नेहमीच संघर्ष करावा लागतो. अजूनही बहुतांश आदिवासी भागात भगत व घरगुती उपचारांचा आधार घेताना दिसून येतो. या विविध समस्यांसोबतच आदिवासी गोंड जमातीत अर्भक, मृत्यू, माता मृत्यू व कुपोषणातून होणारे मृत्यू या समस्या ही अतिशय महत्त्वाच्या आहेत. या आजारासोबतच आदिवासी गोंड जमातीत पोषक आहार, सामाजिक अंधश्रद्धा, अज्ञानता, व्यसनाधीनता, उत्पन्नाची मर्यादित साधने, आरोग्याच्या पुरेशा सुविधांच्या अभाव या सर्वांच्या परिणाम म्हणून आदिवासी समुदायात कुपोषण सोबत माता मृत्यू व अर्भक मृत्यू यांचे प्रमाण कमी होताना दिसून येत नाही. किंबहुना, कुपोषण आणि आदिवासी समुदाय यांचे इतके जवळचे संबंध आहेत की कुपोषित बालके आढळले की लगेचच त्या भागातील आदिवासी समुदायांच्या आरोग्यविषयक च्या सुविधा सोयी - सुविधांवर चर्चा करण्यास सुरुवात होत असते. आदिवासींच्या पारंपारिक जीवन पद्धतीतून निर्माण झालेले प्रश्न व आधुनिक समाजाच्या संपर्काने निर्माण होणारे प्रश्न या दोघांना एकाच वेळी आदिवासी समुदायाला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यात सुधारणा होण्याऐवजी त्यांचे सामाजिक जीवन अधिकच समस्याग्रस्त झाल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने आदिवासी समुदायाच्या विकासासाठी कल्पना व योजना भरपूर आहेत. त्यांना सुयोग्य स्वरूपात अमलात आणणे व त्यात आदिवासी गोंड समाजातील स्त्रियांना सहभागी होण्यास प्रेरित करणे शक्य झाले तर आदिवासी विकास योजनांमुळे आदिवासी समुदायाचे भवितव्य उज्वल झाल्याशिवाय राहणार नाही.

आदिवासी गोंड जमातीमध्ये प्रचलित असलेल्या अनिष्ट रूढी व प्रथा व आरोग्य विषयक समस्येसाठी जास्त कारणीभूत आहेत. जसे स्त्रीला मासिक पाळीच्या काळात अपवित्र समजून घराच्या संपर्कापासून दूर ठेवले जाते 'माडिया' जमातीत घराच्या पाठीमागे एक झोपडी असते. तिला 'कुरमा' असे म्हणतात. त्या झोपडीत थंडी, ऊन, वारा यांची तमा न बाळगता मासिक पाळीच्या काळात चार-पाच दिवस राहावे लागते. तिला घरचे लोक अन्न देतील तेव्हाच ती जेवण घेऊ शकते. या प्रथेतून स्त्रियांमध्ये अनेक आजार जडल्याचे दिसतात. विवाहित स्त्री गर्भवती राहिली तर कोणतेही आजार झाले तरी औषध देण्याचे कटाक्षाने टाळले जाते. त्यामुळे प्रसुती काळातील स्त्री मृत्यूचे प्रमाण आदिवासी समाजात जास्त आहे. आज स्वास्थ्याच्या सोयी होऊनही बाळंतपण घरीच केल्या जाते. काही आदिवासी गोंड जमातीतील युवती तिष्ण सुयांनी अंगावर गोंदवून घेतात. गोधनाच्या जखमा चिघळतात. बरेच दिवस ह्या जखमा बऱ्या होत नाही. त्यातूनही अनेक आजार संभवतात. देवी, गोवर, कावीळ हे रोग मांत्रिकाच्या मंत्रोपचाराने बऱ्या होतात अशी चुकीची समजूत आदिवासींमध्ये रूढ आहे. या अनिष्ट प्रथेमुळे आरोग्य विषयक समस्या अधिक तीव्र बनतात असे दिसते.

आदिवासींमध्ये गोंड जमातीत वनौषधीचे ज्ञान पिढ्यानपिढ्या पुढे नेले जाते. सर्दी तापापासून ते सर्पदशापर्यंत अनेक आजारांसाठी विशेष वनस्पतींच्या मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. गर्भावस्था आणि प्रसुतीसाठीही स्थानिक दायी व औषधींचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. आदिवासींमध्ये नैसर्गिक आहार, शारीरिक श्रम, सामूहिकता आणि नृत्य, सण, यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. पारंपरिक पद्धतीमध्ये अनेकदा औषधी वनस्पती आणि घरगुती उपायांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. परंतु अंधश्रद्धा आणि आधुनिक सुविधांच्या अभावामुळे आरोग्य सेवा मिळण्यात अनेक अडचणी येतात. यासाठी पारंपारिक आणि आधुनिक पद्धती एकत्र आणणे,आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवणे आणि आरोग्य शिक्षण देणे हे उपाय आहेत. गोंड जमातीमध्ये आरोग्य विषयक धारणा आजारपणाला ते शारीरिक पातळी पुरते सीमित न मानता त्यांचा संबंध निसर्गाशी, आध्यात्मिक, सामाजिक व पर्यावरणीय घटकांशी जोडून पाहतात. आधुनिक आरोग्य व्यवस्थेच्या उपलब्धतेनंतरही पारंपारिक पद्धतींचा वापर त्यांच्या जीवनात प्रभावीपणे दिसून येतो.

स्त्री आरोग्याच्या संदर्भात झालेल्या अध्ययनामध्ये मातृ मृत्युदर, कुपोषण, रक्तशय, (अॅनिमिया) प्रसुती दरम्यानची जोखीम बालमृत्युदर या समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आलेले आहे. "राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण"(NFHS) अहवालानुसार, आदिवासी स्त्रियांमध्ये रक्ताशय आणि पोषण अभावाचे प्रमाण इतर सामाजिक गटांच्या तुलनेत जास्त आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढत असले तरी दूरस्थ व वनवासी भागांमध्ये अजूनही घरगुती प्रसूतीचे प्रमाण लक्षणीय आहे.

भारत सरकारच्या आदिवासी आरोग्य सर्वेक्षण अहवालानुसार, गोंड जमातीतील महिलांना आरोग्य, शिक्षण, कुपोषण, आणि सामाजिक दडपशाही अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ज्यात "रोगांचे चौपट ओझे" (संसर्गजन्य कुपोषण,NCDs, मानसिक आजार) असते. आदिवासी विशेषता गोंड जमातीमध्ये आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक नसून निसर्ग, आत्मा, आणि समाजाशी जोडलेले एक समग्र चक्र आहे. तिथे पारंपारिक उपचार (वनौषधी, स्थानिक वैद्य) आणि धार्मिक विधी महत्त्वपूर्ण आहेत, पण आधुनिक आरोग्य सेवा

(माता-बाल आरोग्य, लसीकरण, पोषण) स्वीकारणे आवश्यक आहे. कारण दुर्गमतेमुळे कुपोषण, संसर्गजन्य रोग (मलेरिया) आणि कमी वयात गर्भधारणा यांसारख्या योजनांद्वारे पारंपारिक ज्ञानाला आधुनिक वैद्यकशास्त्रांची जोडणे गरजेचे आहे.

आदिवासी गोंड जमात ही निसर्गाशी अतूट नातं जपणारी व पारंपारिक ज्ञानाने समृद्ध अशी जमात आहे. त्यांच्या जीवनशैलीमध्ये आरोग्य, निसर्ग, संस्कृती, आणि अध्यात्म यांचे एक वेगळे मिश्रण दिसून येते. आधुनिक आरोग्य व्यवस्थेत जसे की, प्रसूतीपूर्व तपासण्या, रुग्णालय प्रसूती, लसीकरण, वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत असल्या तरी सांस्कृतिक अडथळ्यांमुळे त्यांच्या पूर्ण स्वीकार होत नाही, त्यामुळे गोंड स्त्रियांच्या पारंपारिक आरोग्य ज्ञानाच्या अभ्यास आणि आधुनिक आरोग्य सेवेची त्यांच्या संबंध समजून घेणे आवश्यक आहे.

## पूर्व अध्ययनाचा आढावा (Review of Literature)

"Tribal Health in India: Problems and Challenges"(2019) या संशोधनामध्ये देसाई आणि कुलकर्णी यांनी भारतातील आदिवासी समाजाच्या आरोग्य समस्यांच्या सामाजिक-आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातून सखोल अध्ययन केले असून हे अध्ययन "Economic and Political Weekly" या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. हा पेपर आदिवासींमध्ये त्यांच्या पारंपारिक आरोग्य व पद्धतींचे परीक्षण करतो. या अध्ययनात त्यांनी आदिवासी समुदायातील कुपोषण, माता व बालमृत्युदर, संसर्गजन्य आजार, तसेच आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोच या प्रमुख समस्या स्पष्ट केल्या आहेत. म्हणून आदिवासी गोंड जमातीतील स्त्रीआरोग्य समस्यांचे मूळ केवळ वैद्यकीय नसून दारिद्र्य, सामाजिक वंचना, स्थलांतरण, शिक्षणाच्या अभाव, आणि आरोग्य व्यवस्थेतील संरचनात्मक त्रुटीही आहेत. यामध्ये सरकारी आरोग्य योजना व कार्यक्रम अस्तित्वात असतानाही आदिवासी भागांमध्ये त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता आणि आदिवासी संस्कृती बाबत असलेली असवेदनशीलता यामुळे आधुनिक आरोग्य व्यवस्थेच्या अपेक्षित लाभ आदिवासींमध्ये गोंड जमातीतील स्त्रियांना मिळत नाही. त्यामुळे आदिवासी समाज विशेषतः स्त्रिया पारंपारिक उपचार पद्धतींवर अवलंबून राहतात. या बाह्य प्रभावांना तोंड देताना तिची स्वायत्तता आणि प्रासंगिकता टिकवून ठेवण्यात तिला कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागते याचे परीक्षण करतो. तसेच आदिवासींमध्ये आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी धोरणात्मक बदल, आरोग्यवस्थेतील समावेशकता आणि समुदायवर आधारित आरोग्य मॉडेलची गरज अधोरेखित केलेली आहे.

"Traditional Health Practices among Gond Tribal Women of Central India" (2016) या संशोधनामध्ये चौधरी यांनी गोंड जमातीच्या पारंपारिक स्त्री आरोग्य प्रणालीला समजून घेऊन त्यामध्ये विकास धोरणांचा हस्तक्षेप यांचे विश्लेषण करतो. त्यांचे हे अध्ययन Journal of Tribal Studies 8 (2), (JTS) 67-78. यामध्ये प्रकाशित झालेले आहेत. हा पेपर मध्य भारतातील गोंड आदिवासी स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या पारंपारिक आरोग्य पद्धतींच्या अभ्यासावर भर देतो. या अभ्यासात स्त्रिया गर्भधारणा, प्रसुती, मासिक पाळी व सामान्य आजारांमध्ये औषधी वनस्पती, स्थानिक वैद्य आणि धार्मिक सांस्कृतिक उपचार पद्धतींवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे दिसून येते. आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध असतानाही सांस्कृतिक विश्वास, आर्थिक अडचणी आणि आरोग्य सेवांपर्यंत पोहोच नसल्यामुळे पारंपरिक उपचारांना प्राधान्य दिले जाते. जसे की, शिक्षणाच्या प्रसार शासकीय आरोग्य योजना आणि आरोग्य कार्यकर्त्यांच्या हस्तक्षेपामुळे काही प्रमाणात बदल घडून येत आहे. हा अभ्यास गोंड स्त्रियांच्या आरोग्य-वर्तनाचे सामाजिक-सांस्कृतिक पैलू समजून घेण्यासाठी महत्त्वाचे ठरत असतो. आणि परंपरागत आरोग्य संकल्पना व आधुनिक आरोग्य व्यवस्थेतील ताणतणाव विश्लेषित करतो.

साळुंखे, राजेंद्र (2016) यांनी "आदिवासी स्त्री आरोग्य व पारंपारिक उपचार पद्धती" या ग्रंथात आदिवासी स्त्रियांचे आरोग्य, प्रजनन प्रक्रिया, मासिक पाळी, प्रसुती, कुपोषण तसेच औषधी वनस्पतींवर आधारित पारंपारिक उपचार पद्धती यांचे अध्ययन करण्यात आलेले आहे. तसेच आदिवासी स्त्रियांच्या आरोग्य समस्यांचा अभ्यास करणारे एक महत्त्वाचे समाजशास्त्रीय व मानववंश शास्त्रीय संशोधनात्मक कार्य आहे. या पुस्तकात आदिवासी स्त्रियांच्या व दैनंदिन जीवनशैलीचा त्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम स्पष्ट करण्यात आला आहे. कुपोषण, रक्तशय, माता मृत्यू, बालमृत्यू, प्रजनन आरोग्याची संबंधित समस्या या केवळ वैद्यकीय नसून सामाजिक समस्या असल्याचे स्पष्ट केलेले आहे. विशेषतः मासिक पाळी व प्रसुती संदर्भातील अंधश्रद्धा आणि सामाजिक निर्बंध स्त्री आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करतात.आधुनिक आरोग्य व्यवस्थेच्या स्वीकार करतांना येणाऱ्या अडचणीवर प्रकाश टाकला आहे. भाषेची अडचण, आरोग्य कर्मचाऱ्यांचा असंवेदनशील दृष्टीकोन व सांस्कृतिक विसंगती यामुळे आदिवासी स्त्रिया आधुनिक आरोग्य सेवांकडे संकोचाने पाहतात. त्यामुळे परंपरागत ज्ञानाच्या सन्मान

राखून आधुनिक वैद्यकीय सेवा पुरवण्याच्या समन्वयात्मक दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. हा ग्रंथ गोंड जमातीतील स्त्री आरोग्याच्या अध्ययनासाठी उपयुक्त ठरतो.

काही अध्ययनामध्ये असे दिसून येते की, आरोग्य कर्मचाऱ्यांची सांस्कृतिक असवेदनशीलता, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या नकारात्मक अनुभव, दवाखान्यांचे अंतर, भाषेची अडचण, वाहतुकीच्या अभाव यामुळे आदिवासी स्त्रिया आधुनिक आरोग्य सेवांपासून दूर राहतात. परिणामी, त्या पारंपारिक दाया आणि स्थानिक वैद्यांवर अधिक अवलंबून राहतात. या उलट काही अभ्यासांमध्ये आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि जननी सुरक्षा योजनेसारख्या उपक्रमामुळे मातृ व बाल आरोग्यात सुधारणा होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives)**

- गोंड समाजातील स्त्री आरोग्याचे पारंपरिक विचार समजून घेणे.
- परंपरागत उपाययोजनांचा वापर व मर्यादा शोधणे.
- आधुनिक आरोग्य व्यवस्थेबद्दल गोंड महिलांच्या स्वीकार, विश्वास आणि अडथळे तपासणे.
- गर्भधारणा, प्रसुती, मासिक पाळी, पोषण आणि दैनंदिन आरोग्याबाबत परंपरांचे विश्लेषण करणे.
- स्त्री आरोग्यावर सामाजिक-सांस्कृतिक घटकांचा होणारा परिणाम समजून घेणे.
- दोन्ही आरोग्य व्यवस्थेचे तुलनात्मक अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

प्रस्तुत शोधिबंधात गोंड महिलांच्या मुलाखती, पारंपारिक दाई वैद्य यांच्याशी संवाद, आरोग्य कर्मचारी, संशोधन लेख, सरकारी अहवाल, आरोग्य सर्वेक्षण व संबंधित साहित्य यांचे गुणात्मक अध्ययन करण्यात आले.

**परिणाम व चर्चा (Discussion)**

या संशोधनातून गोंड जमातीतील स्त्री आरोग्य व्यवस्थेचे द्वितीय स्वरूप स्पष्टपणे समोर येते. एकीकडे परंपरागत आरोग्य संकल्पना आणि उपाययोजना या गोंड समाजाच्या दैनंदिन जीवनाच्या अविभाज्य भाग आहे. तसेच दुसरीकडे आधुनिक आरोग्य व्यवस्थेच्या स्वीकार हळूहळू होत असल्याचे दिसून येते. या दोन्ही व्यवस्थांच्या वापर, स्त्रिया परिस्थिती, आजाराची तीव्रता, उपलब्ध साधने, आणि सामाजिक मान्यतेनुसार करतात.

परंपरागत आरोग्य व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाच्या पैलू म्हणजे निसर्गाशी घनिष्ट नाते, गोंड समाजात आजारपणाला निसर्गातील असंतुलन, दैवी शक्ती किंवा सामाजिक नियमांचे उल्लंघन यांच्याशी जोडले जाते. त्यामुळे उपचारांमध्ये वनौषधी बरोबरच धार्मिक व सांस्कृतिक विधींचा समावेश केला जातो.

स्त्री आरोग्याच्या संदर्भात परंपरागत पद्धतीना विशेष महत्त्व दिले जाते. गर्भधारणा, प्रसुती या प्रक्रिया नैसर्गिक मानले जात असल्यामुळे वैद्यकीय हस्तसेप मर्यादित ठेवला जात असतो. परंपरागत आरोग्य पद्धतींवर विश्वास बसण्यासाठी अनेक कारणे आहेत, या पद्धती सहज उपलब्ध, कमी खर्चिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या स्वीकारत असतात. विशेषतः गर्भधारणा व प्रसुतीच्या काळात स्त्रिया दाईकडे अधिक सुरक्षिततेची भावना व्यक्त करतात. तसेच आधुनिक आरोग्य केंद्रातील अपुरी सुविधा, भाषेची अडचण, कर्मचाऱ्यांच्या अनादरयुक्त व्यवहार, आणि लांबचे अंतर यामुळे अनेक स्त्रिया तेथे जाण्यास विचार करतात.

गंभीर आजार, प्रसुतीतील गुंतागुंत, लसीकरण आणि शस्त्रक्रिया यांसाठी आधुनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व गोंड समाजात हळूहळू मान्य होत आहे. संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वाढणे, गर्भ तपासणी व लसीकरणाचा स्वीकार हे यांचे सकारात्मक संकेत आहेत. हे दिसून येते की, आधुनिक आरोग्य व्यवस्था पूर्णतः नाकारली जात नसून गरजेनुसार स्वीकारली जात आहेत.

या अभ्यासातून परंपरागत व आधुनिक आरोग्य व्यवस्थांमध्ये संघर्ष नसून त्यांच्यात समन्वय साधण्याची मोठी संधी आहे. पारंपारिक दाया व स्थानिक वैद्य यांना प्राथमिक आरोग्य व्यवस्थेची जोडल्यास संदर्भ प्रणाली मोठ्या प्रमाणात प्रभावी होऊ शकते. तसेच आधुनिक आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्थानिक संस्कृती, श्रद्धा व परंपरांच्या आदर राखल्यास आदिवासी स्त्रियांमध्ये विश्वास निर्माण होऊ शकतो.

चर्चेच्या आधारे असे दिसून येते की, गोंड जमातीतील स्त्री आरोग्याच्या प्रश्न केवळ आरोग्य व्यवस्थेपुरता मर्यादित नसून तो सामाजिक, सांस्कृतिक आणि विकास प्रक्रियेशी संबंधित आहे. परंपरागत ज्ञानाचे संवर्धन व आधुनिक वैद्यकीय सेवांचा वैज्ञानिक वापर या दोन्ही व्यवस्थांमध्ये समन्वय साधल्यास आदिवासी स्त्रियांच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा होऊ शकते.

**निष्कर्ष (Conclusion)**

प्रस्तुत अभ्यासातून असे निष्कर्ष दिसून येतात की, गोंड जमातीतील स्त्री आरोग्य व्यवस्था ही परंपरागत विचारांवर आधारित असून आधुनिक आरोग्य व्यवस्थेच्या स्वीकार हळूहळू वाढत असून परंपरागत

उपचार पद्धती पूर्णपणे नाकारता येत नाही, त्यामुळे त्यातील महत्त्वाच्या व घटकांच्या वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून आधुनिक आरोग्य व्यवस्थेशी समन्वय साधने आवश्यक आहे.

या संशोधनातून असे स्पष्ट होते की, गोंड जमातीतील स्त्री आरोग्याच्या प्रश्न हा केवळ वैद्यकीय नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक स्वरूपाचा आहे. सांस्कृतिक दृष्ट्या संवेदनशील आरोग्य धोरणे, स्थानिक सहभाग, जनजागृती आणि स्त्री शिक्षणावर भर दिल्यास आदिवासी स्त्री आरोग्यात शाश्वत व सर्व समावेशक सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. तसेच स्थानिक संस्कृतीला समजून घेऊन आरोग्याबद्दल धोरणे राबविल्यास आदिवासी स्त्रियांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथसूची (References)**


- आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था TRTI (2017) गोंड जमातीतील स्त्रियांचे आरोग्य व पोषण .पुणे महाराष्ट्र शासन.
- Chaudhary, A. (2016). Traditional health practices among Gond tribal women of Central India.journal of Tribal Studies, 8 (2) 67-78.
- Desai,S,& Kulkarni, V. (2019). Tribal health in India: Problems and challenges, Economic and political weekly, 54 (12),45-52.
- गायकवाड, मीना (2016) गोंड आदिवासी स्त्रियांचे आरोग्यविषयक प्रश्न. नागपूर : लोक वाड्मय गृह.
- जाधव, रेखा (2014) आदिवासी समाजातील स्त्री आरोग्य समस्या गोंड जमातीचा अभ्यास.
- ठाकरे ,सुनिता (2018) गोंड जमातीतील मातृआरोग्य परंपरा व आधुनिकता. नांदेड. साई प्रकाशन.
- माळी शारदा, (2015) आदिवासी स्त्रियांचे प्रजनन आरोग्य गोंड समाजाच्या अभ्यास, जळगाव विद्या प्रकाशन.
- शिंदे, संगीता (2017) गोंड जमातीतील मासिक पाळी विषयक समज व प्रथा, पुणे डायमंड पब्लिकेशन्स.
- साळुंखे, राजेंद्र (2016) आदिवासी स्त्री आरोग्य व पारंपारिक उपचार पद्धती ( गोंड जमात ) औरंगाबाद कैलास प्रकाशन.